**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत शब्दकोश प्रकल्पासाठी देण्यात येणारे अनुदान वाढवून देणेबाबत.....**

**मराठी भाषा विभाग,**
शासन निर्णय क्रमांक मसाअ १०११/ प्र.क्र.७०/२०११/ भाषा-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : १९ जानेवारी , २०१२**

**वाचा-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एमएमडी १०६९/बीएलसी, दि.९.१०.१९६९

**प्रस्तावना :**

शब्दकोशाचा महत्वाकांक्षी प्रकल्प तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष असतांना त्यांच्या काळात सुरु करण्यात आला होता. सदर प्रकल्पास सामान्य प्रशासन विभागाकडून दि.९.१०.१९६९ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती. सदर प्रकल्पास सध्या देण्यात येत असलेले रु.८०,०००/- प्रतिमाह इतके अनुदान वाढवून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णयान्वये राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे वाढती महागाई व इतर वाढता खर्च विचारात घेऊन सध्या या प्रकल्पाला देण्यात येत असलेले रु.८०,०००/- (रुपये ऐंशी हजार फक्त) प्रतिमाह इतके अनुदान वाढवून त्याऐवजी रु.१,००,०००/-(रुपये एक लक्ष फक्त) करण्याच्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात आहे.

१. या शासन निर्णयान्वये, वरीलप्रमाणे शब्दकोश प्रकल्पाच्या अनुदानात होणारा वाढीव खर्च मंडळाच्या "मागणी क्र. झेड एफ ०२, २२०५ , कला व संस्कृती (००)१०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनेत्तर योजना (०१)(०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदाने (योजनेतर)" या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

२. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

( संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६१८००७३३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ललिता शि. देठे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग/व्यय - ४ , मंत्रालय, मुंबई,,
८. **निवड नस्ती (भाषा-३).**